१२.१५
१८.५.२०२२

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :१८/०५/२०२२

# प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

**नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी**
**महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये**
**नागरिकांच्या मागास प्रवर्गास (ओबीसी, व्हीजे एनटी) आरक्षणासाठी**
**घटित केलेल्या समर्पित आयोगाच्या भेटीचा कार्यक्रम घोषित**

**संदर्भ :- जावक क्रमांक : सामन्य/नपा/समर्पित आयोग/२०२२-६१८ दिनांक: १७/०५/२०२२ द्वारे प्राप्त झालेले निर्देश**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायती आणि शहरातील महानगर पालिका, नगर पालिका आणि नगर पंचायती या स्थानिक संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास (ओबीसी, व्हीजे एनटी) आरक्षण देण्यासाठी मा. सार्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने समर्पित आयोग घटित केला आहे.

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि या क्षेत्रात काम करणा-या विविध सामाजिक संघटना यांची निवेदन स्वीकारण्यासाठी या समर्पित आयोगाने विभागवार कार्यक्रम जाहीर केला आहे.

या समर्पित अयोगाच्या भेटीच्या वेळी आपली मते नागरिकांना वेळेत मांडता यावीत आणि निवेदन देता यावेत यासाठी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयात आपल्या नावाची नोंदणी भेटीच्या दिनांकापूर्वी करावी असे आयोगातर्फे निवेदन करण्यात आले आहे.

यासाठी ठाणे जिल्हयातील नागरिकांनी कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क करावा.
कोकण विभगाकरिता समर्पित आयोगाच्या भेटीचा कार्यक्रम २५ मे २०२२ वार बुधवार रोजी दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत विभागीय आयुक्त कार्यालय कोकण भवन येथे आहे.

**प्रशासक तथा आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**

सोबत : सहपत्र

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,(वेबसाईड वर प्रसिध्द करीता)